अंजीर

प्रस्तावना

व्यापारी दृष्टीने अंजिराची लागवड फक्त महाराष्ट्रातच केली जाते. सध्या महाराष्ट्रात एकूण ४१७ हेक्टर क्षेत्र अंजीर लागवडी खाली असून त्यापैकी ३१२ हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र एकटया पुणे जिल्ह्यात आहे. सातारा व पुणे जिल्ह्याच्या शिवेवरील नीरा नदीच्या खो-यातील खेड-शिवापूरपासून जेजूरीपर्यंतचा (पुरंदर-सासवड तालुका) १०-१२ गावांचा परिसर हाच महाराष्ट्रातील अंजिर उत्पादनाचा प्रमुख भाग होये. औरंगाबादवजवळील दौलताबाद भाग, नाशिक आणि पूर्व खानदेश जिल्ह्यात या फळझाडची थोडीफार लागवड होते.

अंजीर हे कमी पाण्यावर येणारे काटक फळझाड आहे. अलिकडे सोलापूर-उस्मानाबाद येथे (अंजिराची) लागवड शेतकरी करु लागले आहेत. त्यावरुन अंजीर हे सर्व दुष्काळी भागात उत्तम होईल असे म्हणायला हरकत नाही.

अंजीर हे पोषणदृष्टया पौष्टीक फळ आहे. तसे ते औषधी आहे. ताज्या अंजिरात १० ते २८ टक्के साखर असते. चुना, लोह व 'अ' आणि 'क' जीवनसत्वे यांचा उत्तम पुरवठा होतो. अंजीर हे सौम्य रेचक असून शक्तिवर्धक, पित्तनाशक व रक्तशुद्धी करणारे असल्यामुळे इतर (फळांपेक्षा) अधिक मौल्यवान समजले जाते. दम्यावरही त्याचा अतिशय उपयोग होतो.

हवामान

उष्ण व कोरडे हवामान अंजिराला चांगले मानवते. त्यामुळे महाराष्ट्रात हे फळ आणखी मोठया क्षेत्रात करायला भरपूर वाव आहे. कमी उष्णतापमान या पिकाला घातक ठरत नाही. ओलसर दमट हवामान मात्र निश्चितपणें घातक ठरते. विशेषतः कमी पावसाच्या भागात जिथे ऑक्टोबर ते (मार्च पर्यंत) पाण्याची थोडीफार सोय आहे अशा ठिकाणी अंजिर लागवडीस वाव आहे.

जमीन

अगदी हलक्या माळराना पासून मध्यम काळया व तांबडया जमिनीपर्यंत अंजीर लागवड शक्य आहे. भरपूर चुनखडी असलेल्या तांबूस काळया जमिनीत अंजीर उत्तम वाढते. चांगला निचरा असलेली एक मीटर पर्यंत खोल असलेली कसदार जमीन अंजिरासाठी उत्तम होये. मात्र या जमिनीत चुन्याचे प्रमाण असावे. खूप काळया मातीची जमिन या फळझाडाला अयोग्य असते. खोलगट आणि निचरा नसलेल्या जमिनीत हे झाड पहिजे तसे चांगले वाढत नाही.

सुधारीत जाती

अंजिराच्या अनेक जाती आहेत. त्यात सिमरना, कालिमिरना, कडोटा, काबूल, मार्सेल्स, (व्हाईट सान पेट्रो) आदी जाती प्रसिद्ध आहेत. पुणे भागातील पुना अंजिर नावाने प्रसिद्ध असलेली जात (ऍड्रिऍटिक) किंवा कॉमन या प्रकारातील असून महाराष्ट्रात मुख्यतः हीच जात लावली जाते.

अभिवृद्धी किंवा रोप तयार करणे

अंजिराची अभिवृद्धी फाटे कलमाने केली जाते. खात्रीच्या बागायतदाराच्या रोगमुक्त बागेतील जोमदार वाढीची झाडे निवडून नंतर त्यातून उत्तम व दर्जेदार फळे देणारी झाडे निवडावीत व अशा झाडावरील १.२५ सेमी जाडीच्या आठ ते बारा महिने वयाच्या फांदया कलमासाठी निवडतात. लावण्यासाठी फाटेकरताना

फांदीच्या तळाचा भाग व शेंडयाकडील कोवळा भाग छाटून टाकावा व मधला भाग रोपे तयार करण्यासाठी वापरावा. फाटे कलम तीस ते चाळीस सेमी लांब असावेत. त्यावर किमान चार ते सहा फुगीर व निरोगी डोळे असावेत. कलमांचा तळाचा काप डाहेळयाच्या काहीसा खाली घ्यावा आणि वरचा काप डोळयाच्या वर अर्धा सेमी जागा सोडून घ्यावा. दोन्हीही काप गोलाकार घ्यावेत. फाटे कलम गादी वाफ्यावर ३० X ३० सेमी वर किंवा दोन डोळे मातीत जातील अशी लावावीत. कलमे किंचीत तिरिपी करावीत. लावण्यापूर्वी कलमाच्या बुडांना आय.बी.जे. किंवा सिरेडिक्स यासारखे एखादे मूळ फोडणारे संजीवक लावले तर मुळया लवकर फुटतात.

लागवड

पावसाळयापूर्वी मे महिन्यात ५ X ५ मीटर अंतरावर ०.६० X ०.६० X ०.६० मिटरचे खड्डे घ्यावेत. शिफारस केलेल्या अंतरानुसार अंजिर फळपिकाची लागवड केल्यास हेक्टरी ४०० झाडांची लागवड होऊ शकते. चांगली माती, पोयटा, शेणखत, रासायनिक खत सिंगल सुपर फॉस्फेट १/२ किलो प्रति खड्डा व थायमेट १० जी बांगडी पद्धतीने वापरुन पावसाळयापूर्वी खड्डे भरुन घ्यावेत. जून, जुलै मध्ये जमिनीत पाऊस पडून भरपूर ओल झाल्यावर अंजिराची मुळे फुटलेली रोपे खड्डयात लावावीत. रोपावर भरपूर पाने फुटलेली असल्यास फक्त २ ते ३ पाने ठेवून बाकीची पाने खोडाला इजा न होता काढून टाकावीत. खड्डयात मधोमध रोप लावून पाण्याची चूळ द्यावी नंतर कलम रुजेपर्यंत तीन चार दिवसांनी गरजेनुसार पाणी द्यावे.

खते

अंजिराच्या झाडांची नीट व जोमाने वाढ होण्यासाठी लागवडीच्या सुरवातीच्या काळात नियमित खते द्यावीत. एक वर्षाच्या झाडाला साधारणपणे १ घमेले शेणखत व १०० ते १५० ग्रॅम अमोनियम सल्फेट पुरेसे होते. दरवर्षी हे प्रमाण वाढवीत नेऊन ५ वर्षे वयाच्या झाडांना ४ ते ५ घमेली शेण खत व १ किलो अमोनियम सल्फेट द्यवे. लहान झाडांना खते नेहमी पावसाळयाच्या सुरुवातीला घालावीत. नंतर मात्र मोठया झाडांना खते विश्रांतीचा काळ संपताना म्हणजे सप्टेंबर, महिन्याच्या अखेरीस द्यावीत. ५ ते ६ वर्षे वयाच्या झाडास ६०० ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फुरद व २५० ग्रॅम पालाश दिल्याने फळे चांगल्या प्रतीची मिळतात.

पाणीपुरवठा

अंजिराच्या झाडाला फार पाणी लागत नाही. परंत फळझाड वाढीच्या काळात हंगाम, जमिनीचा मगदूर व मशागतीचा प्रकार यानुसार जरूरी प्रमाणे नियमित पाणी द्यावे. झाड फळावर आल्यावर ऑक्टोबर ते मे महिन्यात नियमित पाणी द्यावे. जुलै व ऑगस्ट हा काळ झाडाच्या विश्रांतीचा असतो.

फळे लागून वाढत असताना पाण्यात हयगय होऊ देऊ नये. कारण त्यामुळे फळांच्या आकरावर अनिष्ट परिणाम होतो. फळे पिकू लागल्यावर मात्र पाणी अतिशय कमी म्हणजे आळी नुसती ओली होतील एवढे द्यावे, कारण अधिक पाण्याने फळाची गोडी कमी होते. फळ तोडणे पूर्ण झाल्यावर झाडाचे पाणी बंद करावे.

आंतरपिके

आंतरपिके घेताना मूळ बागेची हेळसांड होता कामा नये व फळझाडांना आंतरपिका पासून उपद्रव ही होऊ नये. यासाठी आंतरपिकाची निवड फार महत्वाची ठरते. ही आंतरपिके कमी कालावधीची तर असावीतच शिवाय त्यांची मुळे खूप खोल जाणारी नसावीत. ताग, धैंचा वगैरेसारखी हिरवळीची पिके, फरसबी, मटकी

यासारखी व्दिदल पिके घेतलयाने जमिनीची प्रत सुधारण्यास मदत होते. ज्यावेळी आंतरपिक घेतेले नाही त्यावेळी बाग स्वच्छ ठेवणे हे तितकेच जरुरीचे आहे.

बहार धरणे

अंजिराला दोन वेळा फळ बहार येतो. पावसाळयात येणा-या बहाराला "खट्टा " आणि उन्हाळयात येणा-या बहाराला "मीठा बहार" म्हणतात. खट्टा बहारातील फळे जुलै किंवा ऑगस्टमध्ये तयार होतात, परंतू ती अत्यंत बेचव असतात. त्यामुळे त्यांचा जेली करण्याकरिता उपयोग केला जातो. मीठा बहारातील फळे मार्च, एप्रिलमध्ये तयार होतात. फळांचा दर्जा व उत्पन्न चांगल्या प्रतीचे मिळते व बाजारभाव सुध्दा चांगला मिळतो. त्यामुळे शेतकरी बांधवांनी या बहाराची खास काळजी घ्यावी. यासाठी सप्टेंबर महिन्यात एक उथळ नांगरट करुन एक दोन आठवडे ताण द्यावा. मागील वर्षाच्या फांद्यांची पद्धतशीरपणे छाटणी करुन वर नमूद केल्याप्रमाणे खताची मात्रा द्यावी. यावेळी शेणखत, स्फुरद, पालाश व नत्राचा निम्मा हप्ता द्यावा. वाफे किंवा आळी बांधून बागेस पाणी देणे सुरु करावे. झाडांची सुप्तावस्था संपून त्यांना पाणी आणि खतांचा पुरवठा होताच ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान झाडावर नवीन फूट व फळे वाढीस लागतात. फळांची वाढ चांगली होण्यासाठी नत्राचा उरलेला हप्ता नोव्हेंबर अखेर द्यावा. फळे वाढू लागल्यापासून फळे निघेपर्यंत पाण्याची उणिव भासू देऊ नये.

फळांची काढणी

दुस-या वर्षापासून अंजिरास थोडी थोडी फळे येऊ लागतात. परंतू फळाचे उत्पादन झाडे उत्तम पोसेपर्यंत घेऊ नयेत. चवथ्या वर्षापासून उत्पादन घेण्यास हरकत नाही. सात आठ वर्षाची झाडे झाल्यावर उत्पादन चांगले येते. उत्तम काळजी, मशागत, खते दिली तर एका झाडापासून २५ ते ४० किलो फळे मिळतात.

बहार धरल्यापासून १२० ते १४० दिवसात फळे काढणेस तयार होतात. फळ पक्व होताना फळावरील हिरवी छटा जाऊन फळ पिवळसर लालसर व जांभळया रंगात दिसू लागते पक्व फळ देठासह धारदार चाकूने कापून काढावे. दर दोन दिवसांनी फळ तोडणी करावी. फळे लवकर तयार होणेसाठी केलेल्या प्रयोगात ऍन्सीमिडाल २५० पीपीएम या प्रमाणात झाडावर फवारले असता फळे महिना ते सव्वा महिना आधी तयार होतात.

अंजिर सुकविणे

अंजिर सुकविण्यासाठी "पुना अंजिर" ही जात सर्वोकृष्ट आहे. उत्तम पिकलेली बिनडंखी अंजिराची फळे घ्यावीत. बाहेरुन बंद होणारी पेटी घेऊन त्यात काढता घालता येतील असे जाळीचे खण करुन घ्यावेत. या जाळीवर पिकलेल्या अंजिराची फळे पसरावीत. पेटीच्या खालच्या खणात निखा-याची शेगडी ठेवण्याची सोय करावी. धुरी देण्याचेवेळी जाळीवर फळे ठेवून निखा-यावर, गंधकाची पावडर टाकून पेटी बंद करावी. हे काम द्राक्षाच्या धुरी देण्याच्या चेंबरमध्येही करता येईल. धुरी देऊन झाल्यावर अंजिर पांढरे पडतात. गंधकाची धुरी दिल्याने फळावरील बुरशी मरुन जाते व तिचे पुढील कार्य थांबते. त्यानंतर धुरी दिलेली फळे पेटीच्या बाहेर काढून धूळ, कचरा येणार नाही अशा जागी सुकत ठेवावी. ५ ते ६ दिवसातच अंजिर सुकतात. एक किलो ओल्या अंजिरापासून ३०० ग्रॅम सुके अंजिर मिळतात. सुकलेल्या अंजिरांना गोलाकार आकार देऊन एक लिटर पाण्यात ३० ग्रॅम मिठ घातलेल्या मिश्रणात थोडा वेळ हे सुकलेले अंजिर बुडवावे व नंतर पूर्ण सुकून अंजीर साठवून ठेवावेत.

अंजिरावील किडी व त्याचे नियंत्रण

१)तुडतुडे:- कोवळी पाने, फांद्या व फळे यातील रस तुडतुडे शोषून घेतात. त्यामुळे पानाच्या कडा पिवळया पडून नंतर संपूर्ण पान तपकिरी होऊन वाळते. किडीच्या तीव्र उपद्रवात फळांची वाढ खुंटते व फळे गळून पडतात. बहार धरल्यानंतर रोजच्या रोज बागेवर लक्ष ठेवून किड आढळताच नियंत्रणाचे उपाय करावेत. यासाठी बहाराच्या आरंभीच १०० लिटर पाण्यात २०० मिली रोगार २५० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक घालून फवारा द्यावा.

२)कोळी कीडः- ही अत्यंत सुक्ष्म आकाराची कीड आहे. या किडीमुळे पाने सुकतात कारण ही कीड पाने व फळे समुहाने कुरतडते व रस शोषून घेते. फळे विद्रुप दिसतात व अपुरी वाढ होऊन गळतात. किडीची लक्षणे दिसताच १०० लिटर पाण्यात २५० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक घालून फवारावे.

३) सालबुंधा पोखरणारी आळी:- झाडाच्या बुंध्यावर किंवा फांदीवर भोक पाडून आळी आत जाते व आतील मगंज खाऊन घाण बाहेर टाकते. अशी घाण दिसल्यावर आपणास अळीचा उपद्रव दिसतो. किड होऊ नये म्हणून झाडाचे नियमित निरिक्षण करत जावे. भुसा पडलेला दिसताच आळीने पाडलेले भोक शोधून अळी बाहेर काढून मारावी. अळी न निघाल्यास भोकात पेट्रोल किंवा बोअरसोल्युशन कापसाच्या बोळयाने आत सोडावे व भोक चिखलाने बंद करावे.

४) पाने खाणारी अळी:- पाने खाणारी अळी पानाकडून मध्य शिरेकडे पानाचा भाग कुरतडून खाते. मोठया प्रमाणावर उपद्रव झाल्यास झाडाची पाने नष्ट होऊन पिकाचे नुकसान होते. बागेवर १०० लिटर पाण्यात १०० मिली मॅलेथिआन किंवा नुवाक्रान किडनाशक फवारावे.

५) खवले किड:- खवले किडीचा उपद्रव अंजिरावरही होतो. ही किड फांद्या कोवळया फुटी, डोळे यावर समुहाने राहून रस शोषतत. या उपद्रवाने कोवळया फांद्या वाळतात. फळाचा आकार बेढब होतो. फळाची चव बिघडते. खवले किडीच्या अंगावर जाड कवच असल्याने तिच्यावर या फवारलेल्या स्पर्श विषाचा काहीही उपयोग होत नाही, त्याकीरता नुऑक्रॉन, रोगार, डिमॅक्रॉन अश्या अंतरप्रवाही औषधाचे किड संपूर्ण नष्ट होईपर्यंत औषधाचे फवारे द्यावेत.

अंजिरावील रोग व त्याचे नियंत्रण

१) तांबेरा:- पावसाळयात एक प्रकारच्या बुरशीपासून अंजिरावर तांबेरा होतो. हिवाळयात हवामान दमट राहिले तर नोव्हेंबर ते फेब्रवारी अखेरपर्यंत हा रोग पानावर तांबाडया ठिपक्यात आढळून येतो. नंतर हे ठिपके काळे पडून पाने गळतात. पाने गळून पडल्यामुळे साल उघडी होते व उन्हामुळे सालीवर करपल्यासरखे चट्टे पडतात. त्यामुळे फांद्या कमजोर होऊन फांद्यावरील फळे न पोसता गळून पडतात. उन्हाळयात गळणारी अंजिराची पाने गोळा करुन जाळून टाकावीत. ऑक्टोबरच्या फुटव्यावर तसेच पानावर ३:३:५० बोर्डो मिश्रण किंवा १०० लिटर पाण्यात २०० ग्रॅम ब्लायटॉक्स ५० टक्के घालून फवारावे. बावीस्टीनचे १ टक्का द्रावण फवारावे.

२) भुरी :- अंजिरावर भुरी रोगही होतो. त्यासाठी भुरी दिसताच १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम बावीस्टीन घालून फवारावे.